# मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाकघरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

☎कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com


**पत्र :**

क्रमांक : कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/२०६७
कोल्हापूर - ३. दिनांक :- १/८/२०१५

प्रति,

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर

उपवनसंरक्षक, सातारा.

विभागीय वन अधिकारी, सांगली.

विषय - वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडील "खानसामा" या संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची प्राथमिक जेष्ठतायादी प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ . १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११.

२.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु-१४/२२१६, दि.३/७/२०१४.

संदर्भीय शासन निर्णय दिनांक २१/१०/२०११ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार खानसामा या संवर्गाची दि.१/१/२०१५ रोजीच्या आपले विभागाकडून प्राप्त झालेल्या जेष्ठता यादीनुसार तसेच ज्या विभागांची माहिती प्राप्त झाली नाही त्यांची या कार्यालयात उपलब्ध माहिती वरुन दि.१/१/२०१५ रोजीची जेष्ठता प्रसिध्द करणेत येत आहे. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), कोल्हापूर, उपवनसंरक्षक सातारा, विभागीय वन अधिकारी सांगली यांना कळविण्यात येते की, सदर जेष्ठता यादी या कार्यालयाचे (www.kolhapurforest.co.in) या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर प्राथमिक जेष्ठतायादीवर कांही आक्षेप असल्यास किंवा जेष्ठता यादीत कांही दुरुस्ती अपेक्षित असल्यास जेष्ठता यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आंत या कार्यालयास कळवावे. मुदत संपल्यावर अंतिम जेष्ठता यादी आपले जबाबदारीवर प्रसिध्द करण्यात येईल.

२.०० संदर्भीय पत्र क्रमाक २ अन्वये, खानसामा संवर्गाची दि.१/१/२०१४ रोजीची वृत्तस्तरीय जेष्ठता यादी (अंतिम) प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जेष्ठता यादीवर कांही आक्षेप असल्यास आक्षेपाचे अनुषगांने प्रमाणीत दस्तऐवजाची छांयाकित साक्षांकित प्रत या कार्यालयास आपले कार्यालयामार्फत सादर करावी.

३.०० वनविभागाचे मंजूर आकृतीबंधानुसार खानसामा या संवर्गाची स्थायी पदे, अस्थायी पदे, मंजूर पदे, कार्यरत पदे, व रिक्त पदे यांचा ताळमेळ घालून, आपले विभागाचा अचूक गोषवारा या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत : वरीलप्रमाणे

मुख्य वनसंरक्षक(प्रा.),कोल्हापूर